# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २७-०२-२०१७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक २७ फेब्रुवारी २०१७ रोजी (का.प.क्र.३६) मा.महापौर श्री.भगवान (बापू) देविदास घडमोडे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-४५ वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरीया,आयएएस, नगर सचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
२. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
४. स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
५. स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
८. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
९. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
१०. स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव
११. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१२. स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे
१३. स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे
१४. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१५. स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
१६. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
१७. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
१८. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
१९. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२०. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२१. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
२२. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२३. स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे
२४. स.स. श्री.चित्ते नितीन रमन
२५. स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
२६. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
२७. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
२८. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग

२९. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३०. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
३१. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
३२. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
३३. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
३४. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
३५. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
३६. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
३७. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
३८. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
३९. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
४०. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
४१. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
४२. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
४३. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
४४. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
४५. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
४६. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
४७. स.स. श्री.शेख जफर अखतर
४८. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
४९. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
५०. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
५१. स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
५२. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन
५३. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
५४. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
५५. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
५६. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
५७. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
५८. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
५९. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
६०. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
६१. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
६२. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
६३. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
६४. स.स. श्री.सोहेल शकील शेख
६५. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे

६६. स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
६७. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
६८. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
६९. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
७०. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
७१. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
७२. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
७३. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
७४. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
७५. स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट
७६. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
७७. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
७८. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
७९. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
८०. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
८१. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
८२. स.स.कु.जमादार सायली भागवत

<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन

श्री.रेणुकादास वैद्य :स्थायी समितीचे सभापती मा. श्री.मोहन मेघावाले यांचा आज वाढदिवस आहे, त्यांना शुभेच्छा देण्यात याव्यात.

श्री.नंदकुमार घोडेले :यास अनुमोदन आहे. नुकत्याच महाराष्ट्रामध्ये महानगरपालिका जिल्हा परिषद निवडणुकीत शिवसेनेला मोठे यश मिळाले. त्याबद्दल शिवसेना प्रमुख मा.श्री.उध्दवजी ठाकरे साहेब यांचे अभिनंदन करावे.

श्री.राजू शिंदे :मा.सभापती, स्थायी समिती यांचे वाढदिवसानिमित्त अभिनंदन करावे. भाजपा पक्षाला सुध्दा मोठे यश निवडणुकीत मिळाले त्याबद्दल मा.श्री.देवेद्रजी फडणवीस तसेच प्रदेशाध्यक्ष श्री.रावसाहेबजी दानवे व ज्यांनी मतदान केले त्या जनतेचे अभिनंदन करावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :ही विशेष सभा आहे. जो विषय आहे तो चर्चेला यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्व पक्षाचे सदस्य निवडणून आले सर्वांचे अभिनंदन करावे.

श्री.गजानन बारवाल :श्री.मोहनजी भैय्या मेघावाले यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा, महाराष्ट्रात महापालिका व जिल्हा परीषदेच्या निवडणुका झाल्या. जो बदल घडून आणला त्याबद्दल मा.मुख्यमंत्री महोदय, मा.रावसाहेबजी दानवे, मा.श्री.उध्दवजी ठाकरे यांचे अभिनंदन करावे. तसेच जिल्हा परीषद सदस्य म्हणून आरपीआयचे

श्री.रमेशजी गायकवाड, एमआयएम पक्षाचे काही सदस्य निवडून आले त्यांचेही अभिनंदन करावे.

मा.महापौर :स.सभापती श्री.मोहन भैय्या मेघावाले यांचा यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा. सभागृहाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात येते. त्यांनी व्यासपिठावर यावे. तसेच निवडणुकीमध्ये चांगल्या प्रकारे यश प्राप्त झाले त्याबद्दल मा.मुख्यमंत्री, श्री.देवेंद्रजी फडणवीस, मा.श्री.उध्दवजी ठाकरे, मा.श्री.रावसाहेबजी दानवे यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते. तसेच श्री.रमेशजी गायकवाड हे जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेले आहे. त्यांचे ही अभिनंदन.

या वेळी मा.श्री.मोहनजी मेघावाले यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

**विषय क्रमांक ९२७:-** **(शनिवार दि.१८.०२.२०१७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील ऐनवेळीचा प्रस्ताव क्र.८९७ संदर्भाने झालेल्या निर्णयानुसार)**
**(कर मुल्य निर्धारक व संकलक)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन 2017-2018 या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या 20 तारखेला निश्चित करणे आवश्यक असल्याने मालमत्ता कर दर निश्चितीचा प्रस्ताव प्रशासनातर्फे दिनांक 17/02/2017 रोजीच्या स्थायी समिती सभेपूढे विषय क्रमांक 129 अन्वये सादर करण्यात आलेला होता. सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, मालमत्ता करांचे दराबाबतच्या प्रस्तावावर सर्व समंतीने निर्णय होणे आवश्यक असल्यामुळे, सर्वसाधारण सभेमध्ये यावर सर्व स.सदस्य चर्चा करून निर्णय घेतील, करीता प्रस्तुत प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यांत आली.

**प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालीलप्रमाणे**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेवुन फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक आहे.

मागील वर्षी २०१६-१७ या आर्थिक वर्षात २०१५-१६ या आर्थिक वर्षाचेच दर कायम करण्यात आले होते. मागील वर्षी कोणतीही कर वाढ करण्यात आलेली नाही. सन २०१७-२०१८ मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक, शैक्षणिक संस्था, भारत सरकारच्या मिळकती, मोबाईल टॉवर्स असे गट करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे,

०१. **निवासी** :- राहते घर, -माहिती तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-७, दिनांक १२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतींचा वापर असल्यास त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.) धर्मादाय संस्था, स्वंयसेवी संस्था, सेवाभावी संस्था.

०२. **निवासेत्तर** :- वकीलाचे कार्यालये, कर सल्लागारांचे खाजगी कार्यालये, शैक्षणिक संस्थेशी संलग्न असलेली वस्तीगृहे, स्वतंत्र वस्तीगृहे.

०३. **व्यावसायीक** :- **०१.** पेट्रोलपंप व त्यास संलग्न असलेली खुली जागा, व्यावसायीक दराने खुल्या जागेचे दर वेगळे आकारले जाईल. हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स, सर्व प्रकारची दुकाने व शासकीय कार्यालये, डॉक्टरांचे क्लिनीक, खाजगी हॉस्पीटल्स्, कमर्शीयल पेड पार्कींगसाठी व्यावसायीक दराने कर आकारण्यात येईल. तसेच ज्या इमारती व्यावसायीक वापरासाठी भाड्याने दिल्या असतील अशा इमारतीनां सुध्दा व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल. **धार्मिक स्थळाच्या जागेवर जर व्यावसायीक वापर होत असेल तर त्यास व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल.**

०४. **शैक्षणिक संस्था** :- **अ)** ज्या शैक्षणिक संस्था अनुदानित आहेत. अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३० टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

**ब)** ज्या शैक्षणिक संस्था विनाअनुदानित आहेत,इंजिनियरींग कॉलेज, मेडीकल कॉलेज अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३७.५ टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

०५. **भारत सरकारच्या मिळकती** :- मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार भारत सरकार व त्यांच्या अंगीकृत असलेली कार्यालये व इतर मिळकती यांना वापरानुसार कर आकारणी करून त्यांना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या सुविधानुसार एकूण कराच्या ७५ टक्के, ५० टक्के व ३३.३३ टक्के रक्कम सेवा शुल्क म्हणून वसूल करण्यात येईल.

०६. **मोबाईल टॉवर्स** :- टॉवरसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार किंवा भाडेपट्टा करारनामानुसार यापैकी जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारण्यात येईल. तसेच बी.एस.एन.एल. व इतर दूर संचार कंपनीचे स्वतःच्या जागेत मोबाईल टॉवर असल्यास अशा मोबाईल टॉवरला तळाचे क्षेत्रफळानुसार रू.९००/- प्रती चौ.मी. प्रती महा दरानुसार कर आकारणी करण्यात येईल. तसेच अनाधिकृत टॉवर्सला मालमत्ता कराची दुप्पट शास्ती लागु राहील.

०७. **औद्योगीक** :- एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.

वरील संज्ञेत मोडत असलेल्या मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे राहील.

०८. **सामान्य करा बाबतचा तक्ता** :-

| **सामान्य कराचा प्रकार वापराप्रमाणे** | **सध्याचे सामान्य कराचे दर** | **प्रस्तावित सामान्य कराचे दर** |
|---|---|---|
| **१.** निवासी (उपरोक्त **'**अ**'** प्रमाणे) | ३०% | ३०% |
| २. निवासेत्तर (उपरोक्त **'**ब**'** प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| **३.** व्यावसायीक (उपरोक्त **'**क**'** प्रमाणे) | ४५% | ४५% |
| ४. औद्योगीक (उपरोक्त **'**ड**'** प्रमाणे) | ३६% | ३६% |
| ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| ६. विना अनुदानित शैक्षणिक संस्था | ३७.५% | ३७.५% |

०९. **उपभोक्ता कर** :-

घनकचरा व्यवस्थापणेसाठी लागणारा खर्च शहरातील सर्व मिळकत धारकांकडुन उपभोक्ता कर म्हणुन वसुल करण्यासाठी खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**०१** निवासी वापराच्या मिळकतीस रू.१००/- उपभोक्ता कर आकारण्यात येईल.

०२ निवासेत्तर, व्यावसायीक, शैक्षणिक, औद्योगिक वापराच्या मिळकतीस रू.५००/- उपभोक्ता कर आकारण्यात येईल.

१०. **नामांतर शुल्क** :-

खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे नामांतर शुल्क कर योग्य मुल्यावर खालील प्रमाणे आकारण्यात येतील.

| **निवासी व व्यावसायीक कर योग्य मुल्य** | **नामांतर शुल्क** | |
|---|---|---|
| | **(शहर, सिडको व औद्योगिक भागातील निवासी मिळकतींसाठी)** | **(शहर, सिडको भागातील व्यावसायीक मिळकतींसाठी)** |
| रू. ०१ ते १०,०००/- | रू.१५००/- | रू.३०००/- |
| रू. १०,००१/- ते ५०,०००/- | रू.४५००/- | रू.९०००/- |
| रू. ५०,००१/- ते पुढे | रू.९०००/- | रू.१८,०००/- |
| **औद्योगिक वसाहतीतील व्यावसायीक मिळकतींसाठी** | | |
| रू.०१ ते ५०,०००/- | | रू.१८,०००/- |
| रू.५०,००१ ते १,००,०००/- | | रू.३०,०००/- |
| रू.१,००,०००/- च्या पुढे | | रू.७५,०००/- |

११. **अदत्त रकमेवरील शास्ती** :-

चालु मागणीचे बिल प्राप्त झाल्यानंतर अशा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रथम सहामाही देयकाची रक्कम ३० जुन पूर्वी व द्वितीय सहामाही देयकाची रक्कम ३१ डिसेंबर पूर्वी भरणे बंधनकारक आहे. जर कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर अशा अद्त रकमेबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण-८ कराधान नियम ४१ अन्वये प्रत्येक महिन्यासाठी कराच्या २ टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून द्यावी लागेल.

११.१ **अवैध इमारतीवर शास्ती बसविणे:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २६७ (अ) नुसार दि.१-४-२००८ पासून अवैध इमारतीवर शास्ती आकारण्यात येते.

उक्त नियमान्वये कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरीत्या बांधकाम करील किंवा पुर्नर बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरूध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल.

परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा असे अवैध बांधकाम किंवा पुर्नर बांधकाम, ते अस्तित्वात असे तो पर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुर्नर बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही, मग असा कालावधी कितीही असो.

(२) पोट कलम (१) अन्वये देय असलेली शास्ती ही, जणू काही शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये निर्धारीत करण्यात व गोळा करण्यात येईल.

१२. <u>विशेष सवलती</u> :-

१२.१ पाच वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास वार्षीक कराच्या सामान्य करात दोन वर्षाची सूट देण्यात येईल.

१२.२ तीन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्या एक वर्षातील वार्षीक कराच्या सामान्य करात ५०% सूट देण्यात येईल.

१२.३ जे मालमत्ताधारक चालु वर्षाचा खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील त्यांना सन २०१७-२०१८ करीता सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

| | |
|---|---|
| एप्रिल | १०% |
| मे | ८% |
| जुन | ६% |

जुलै ते मार्च पर्यंतच्या कालावधीत चालु आर्थिक वर्षातील मागणीवर तसेच थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

१२.४. **आजी / माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या** मिळकतीस मागील वर्षाप्रमाणेच सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात देखील निवासी वापर करीत असलेल्या केवळ एका मिळकतीस सामान्य करात १००% सूट दिली जाईल.

१२.५ जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

१२.६ जे मालमत्ताधारक आपल्या मालमत्तेस रेन हार्वेस्टींग सिस्टीम (Rain Harvesting System) लागु करतील, अशा मालमत्ताधारकास सामान्य करात २५% सवलत दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

१२.७ जे मिळकतधारक नेट बॅकींग, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्डव्दारे ऑन-लाईन मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना अशा मिळकतधारकांना चालु आर्थिक वर्षातील मालमत्ता कराच्या सामान्य करात १% सूट देय राहील.

१३. <u>कर आकारणी प्रणाली</u> :-

औरंगाबाद शहराचे वेगवेगळे भाग पाडुन त्याभागातील मिळकतीच्या / जागेचा मुल्यानुसार त्यांचे वाजवी भाडे आकारणी करण्यासाठी विचारात घेण्यात येते. अशा प्रकारचे भाग पाडुन मुल्यांकन हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणका मधील निवासी जागांच्या किमंती विचारात घेवुन औरंगाबाद शहराचे खालील प्रमाणे भाग करणे योग्य होईल. यामुळे औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागातील मूल्य (जागेचे) वेगवेगळे मिळवुन त्यानुसार मिळकतीचा स्तर (वर्गीकरण) होवुन त्यानुसार मालमत्ता कर आकारणीसाठी दर आकारणे योग्य राहील.

१३.१ सन २०१० चे महाराष्ट्र शासनाकडील सिध्द शिघ्र गणक (Ready Recknor) आधारे दिनांक ०१.०४.२०१० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व मिळकतीसाठी चार विभाग हे मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.९८५ दि.२०-२-२०१० नुसार पूर्वी प्रमाणेच करण्यात आलेले होते. त्यानुसार सन २०१२ मध्ये देखील चार भाग करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सन २०१६ साठी शिघ्र शिध्द गणकाचे दर शासनातर्फे प्रसिध्द झाल्याने सन २०१५ मधील सिध्द शिघ्र गणकातील दरानुसार अ, ब, क, व ड असे चार भाग होतात. खालील कोणत्या भागात कोणती मिळकत येते, हे तपासता येईल. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

| अ. क्र. | विभाग | सन २०१२ च्या विभागानुसार मिळकतीचा सन २०१६-१७ पर्यंतचा प्रचलित दर प्रती चौ.मी. | सन २०१६ च्या विभागानुसार सन २०१७-१८ करीता प्रस्तावित मिळकतीचा दर प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | अ | रू.१७,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती | रू.४५,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती |
| २ | ब | रू.१३,००० ते रू.१६,९९९/- | रू.३४,९०० ते रू.४४,९९९/- |
| ३ | क | रू.११,००० ते रू.९,९९९/- | रू.३१,७९९ ते रू.३४,८९९/- |
| ४ | ड | रू.८५०० ते रू.१०,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) | रू.२५,००० ते ३१,८००/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) |

वरील प्रस्तावित दर हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणकामधील घेण्यात आलेले आहे.

**१४. सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार व सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर आकारण्यात येत आहे.:-**

**निवासी इमारत**

**१४.१ निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दरः- (सन २०१६-१७)**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- | रू.६/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.९/- | रू.८/- | रू.७/- | रू.५/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.८/- | रू.३/- | रू.२/- | रू.१/- |

**१४.२ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.७.५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- | रू.६.२५/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१०/- | रू.३.७५/- | रू.२.५/- | रू.१.२५/- |

इतिवृत्त सर्वसाधारण सभा
दिनांक २७.०२.२०१७
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३६)

## निवासेतर इमारत

**१४.३ (अ) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२२/- | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.७/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू.६/- | रू.३/- | रू.२/- |

**१४.४ (अ) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२७.५/- | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.१७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.८.७५/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६.२५/- | रू.७.५/- | रू.३.७५/- | रू.२.५/- |

## अनुदानीत शैक्षणिक संस्था

**१४.५ (ब) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१३/- | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१२/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.११/- | रू.९/- | रू.८/- | रू.७/- |

**१४.६ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६.२५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३.७५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- |

## कायम विना अनुदानीत संस्था

**१४.७ (क) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७/- | रू.१५/- | रू.१४/- | रू.१३/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |

**१४.८ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२१.२५/- | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |

**व्यावसायीक इमारती**

**१४.०९ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२८/- | रू.२६/- | रू.२४/- | रू.२२/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२४/- | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.१०/- |

**१४.१० सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.३५/- | रू.३२.५/- | रू.३०/- | रू.२७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.३०/- | रू.२७.५/- | रू.२३.७५/- | रू.२१.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१२.५/- |

**१४.११ औद्योगिक क्षेत्रासाठी दर :-**

| अ.क्र. | बांधकामाचा वर्ग | सन २०१६-१७ साठी प्रचलीत दर | सन २०१७-१८ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| | | चौ.मी. | चौ.मी. |
| १ | कारखाना कार्यालय (आर.सी.सी.) | १४.६४ | १८.३० |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | १०.३२ | १२.९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | कारखाना कार्यशाळा (आर.सी.सी.) | ११.६२ | १४.५३ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ९.०४ | ११.३० |
| २ | **कारखाना परिसरातील कॅन्टीन** | २४.०० | ३० |
| ३ | **गोदाम (आर.सी.सी.)** | ९.६८ | १२.१ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ९.६८ | १२.१ |
| | अर्ध पक्के | ५.८२ | ७.२८ |
| | कच्चे आणि विना छताचे | ३.२२ | ४.०३ |
| ४ | **शेड** | २.५८ | ३.२३ |
| ५ | सायकल स्टॅन्ड | ३.८६ | ४.८३ |
| ६ | **मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.)** | ११.४० | १४.२५ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ८.८२ | ११.०३ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ७.१० | ८.८८ |
| | कच्चे बांधकाम | ३.१० | ३.८८ |
| ७ | **निवासी क्षेत्र (आर.सी.सी.)** | १६.१४ | २०.१८ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | १२.९२ | १६.५ |
| | अर्धे पक्के बांधकाम | ११.४० | १४.२५ |
| | कच्चे बांधकाम | ६.४४ | ८.०५ |
| ८ | **सहान जागा** | | |
| | कारखाना वापर | १२.०४ | १५.०५ |
| | रिकामे | ९.०३ | ११.२९ |

**१४.१२ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.००/- | रू.२.५०/- | रू.२.००/- | रू.२/- |

**१४.१३ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.७५/- | रू.३.१३/- | रू.२.५/- | रू.२.५/- |

**१४.१४ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर/व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळया जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी. | रू.१२.५०/- | रू.१०.५०/- | रू.९.००/- | रू.७/- |

**१४.१५ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१५.६३/- | रू.१३.१३/- | रू.११.२५/- | रू.८.७५/- |

**टिप** :- मोकळ्या जागेची आकारणी करतांना फक्त सामान्य कर आकारण्यात येईल.

**१५. मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०१६-२०१७ साठी प्रचलीत दर व सन २०१७-१८ चे प्रस्तावित दर पुढील प्रमाणे :-**

| अ.क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन २०१६-१७ साठी प्रचलीत दर | सन २०१७-१८ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% | ४५% |
| | | ४. औद्योगिक वापर | ३६% | ३६% |
| | | ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| | | ६. विना अनुदानित शै.संस्था | ३७.५% | ३७.५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % | १० % |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % | १० % |
| | | ४. औद्योगिक वापरासाठी | १०% | १०% |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % | १.५ % |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % | १.५ % |
| ८ | जलनि:सारण कर | | १.५ % | १.५ % |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | सेवरेज कर | १. निवासी वापरासाठी | १० % | १० % |
| | | २. निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी | १५ % | १५ % |
| | | ३. औद्योगिक वापरासाठी | ५ % | ५ % |
| | | ४. औद्योगिक वसाहतीतील निवासी वापर | १० % | १० % |
| १० | उपभोक्ता कर | निवासी वापरासाठी | १०० प्रती वर्ष | १०० प्रती वर्ष |
| | | निवासेतर / व्यावसायीक वापरासाठी | ५०० प्रती वर्ष---- | ५०० प्रती वर्ष---- |

१६ **शासनाचे कर** :- तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

करिता, सन २०१७-१८ साठी मालमत्ता कर आकारणी व वसूलीचे दराचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.आयुक्त :टॅक्स ॲसेसमेन्ट व जी काही वसुली करतो, यात मालमत्ता कर वाढ करण्याचे प्रस्तावित केले आहे. सन-२०१२-१३ नंतर वाढ केली नाही. या प्रस्तावात डिटेल दिले आहे. जसे निवासी वापरातील आरसीसी छत त्यात ११ रू. होते. त्यात २५ टक्के वाढ केली. अशी प्रत्येक ठिकाणी वाढ आहे.

श्री.राजू शिंदे :जे कर भरतात. त्यांचेवरच बोजा टाकणार काय? जे टॅक्स भरत नाही. त्यांचे मालमत्ताचे ॲसेसमेन्टच झाले नाही. त्यांचे काय करणार आहे. प्रशासनाने २३० कोटीचे उद्दिष्ट ठेवले होते. तेवढे वसुल झाले का? जी वसुली झाली त्यात प्रशासन समाधानी आहे का?

श्रीमती अंकिता विधाते :सन-२०१६ मध्ये मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचे ठरले. अद्याप काम सुरू केले नाही. सन-१९८९ च्या नंतर मालमत्ताचे रिव्हीजन झाले नाही. आतापर्यंत र.रु. ८० कोटी वसुल झाले. र.रु.१५० कोटीचा गॅप कसा भरून काढणार आहे?

श्रीमती समीना शेख :उद्दिष्टा पेक्षा वसुली कमी, र.रु.१५ कोटी नोटा बंदीमूळे मिळाले. तरी वसुली कमी का? टॅक्स वसुलीसाठी निविदा प्रक्रिया राबविली होती. पुढे काय कार्यवाही केली?

श्री.राजगौरव वानखेडे :ज्यातून उत्पन्न मिळणार होते, विभाग वाईज वसुली किती झाली? उद्दिष्ट किती होते?

श्री.दिलीप थोरात :एलबीटीतून मनपास उत्पन्न येत होते, ते बंद झाले, आता मालमत्ता कर हे प्रमुख उत्पन्नाचे साधन, शहरात ३ लक्ष मालमत्ता असतील पैकी २.०३ लक्षच मालमत्ता रेकॉडवर व कर लागलेला आहे व त्यापैकी ३३ टक्केच लोक कर भरतात. शहरातील संपूर्ण मिळकतीचे सर्वेक्षण व्हावे सर्वांना कर लावावा. अनेक वेळा बैठका झाल्या. कर्मचारी नाही. असे प्रशासन नेहमीच सांगते. कर्मचाऱ्यांचे पगार नाही. वसुलीकडे दुर्लक्ष केले. पुर्ण वर्षभर कामाला वसुलीसाठी नियोजन असावे. जो दर वाढीचा प्रस्ताव दिला त्यास विरोध आहे. जे भरतात त्यावरच

बोजा पडेल. नवीन मिळकतीचा शोध घ्यावा. त्यांना टॅक्स आकारावा. वसुली करण्यावर भर द्यावा.

श्री.अब्दुल नाईकवाडी :कर वाढीला विरोध आहे. गुंठेवारी भागातून डबल टॅक्स वसुल करतात. यामूळे गुंठेवारी रेग्युलाईज होणार आहे का? गुंठेवारी भागाचा सर्वे करून रेग्युलाईज करावे. यापुर्वी कंपनीने सर्वे केला होता. अनेक ठिकाणी जास्तीचा कर लावण्यात आला. जनतेने तो अमान्य केला. आता पुन्हा नव्याने सर्वे करावा. अनेक मिळकती नव्याने झाल्या आहेत, बांधकामे झाली. त्याप्रमाणे कर आकारल्यास वसुली जास्त होईल. ७० टक्के घरांना आजही टॅक्स लागलेला नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :शहरात २.०३ लक्ष मालमत्ता त्यापैकी कर भरणारे फक्त ७० हजार बाकीचे कर भरत नाही. जे नियमितपणे भरतात, त्यांचेवर वाढीव कराचा बोजा टाकणे योग्य नाही. जी दरवाढ केली, त्यास विरोध आहे. मान्य करू नये. नवीन बांधकाम होते. बदल होतो. त्याप्रमाणे कर आकारला जात नाही. संपुर्ण शहरातील मालमत्ताचे सर्वेक्षण व्हावे. सर्वेक्षण करायच्या निविदा्रचे काय झाले? नव्याने सर्वेक्षणाची निविदा काढावी. निवासी वापरामध्ये कमर्शियल वापर सुरू झाला. सातारा-देवळाई मनपात आले. घर तेथे कर लावणे आवश्यक आहे. त्या भागात शिबीर घ्यावे. शैक्षणिक संस्थांच्या कराबाबत वादग्रस्त प्रकरण आहे. र.रु.१३ कोटी येणे बाकी आहे. मोबाईल टॉवर्सच्या माध्यमातून र.रु.१० कोटी येणे आहे. हे प्रकरण न्यायालयात गेले. त्या बाबतही कार्यवाही करावी. राज्य, केंद्र शासनाच्या अनेक इमारती तेथे नवीन बांधकाम होते. त्याप्रमाणे कर लावावा, वसुल करावा. अशा मिळकतीचा सर्वे करावा, रेकॉर्डवर घ्यावे. मंगल कार्यालय, लॉन्स, मॉल, ३ स्टार हॉटेल अशा मिळकीतींचा शोध घेऊन योग्य तो कर आकारून वसुली करावी. अनधिकृत मिळकतींना डबल टॅक्स लावतो ते भरत नाही. सिंगल टॅक्स लावून रेकॉर्डवर घ्यावे. अटी शर्ती शिथील करावे. अनेक लोक कर भरण्यास तयार आहेत. मनपाच्या मिळकतीला रेडीरेकनर प्रमाणे भाडे आकारण्याबाबत प्रस्तावित होते. ती कार्यवाही करावी. एखादी इमारत विना परवानगी बांधली असेल व नंतर परवानगीसाठी आले १ हजार स्क्वे.फुट बांधकाम असेल तरी र.रु.१० हजार दंड आकारतो. त्यात जास्तीत जास्त कर लावण्याचा ठराव मंजूर केला. कार्यवाही करावी. पाणीपट्टी वसुली कडे लक्ष द्यावे. तसेच होर्डींग, तलाव, पार्कींग, सभागृह यांना सुध्दा योग्य भाडे आकारून निर्णय घ्यावा. नाट्यगृहाचे खाजगी करण करावे. निर्णय घेतला कार्यवाही नाही. मालमत्ता विभाग वर्ग-१ अधिकाऱ्यांकडे द्यावा. मा.न्यायालयातील प्रकरण खाजगी तडजोडीने कर अदालत घेऊन निकाली काढावे. सेल्फ ॲसेसमेंन्ट करावे. सर्व मिळाकतीना टॅक्स आकारला पाहिजे. असे नियोजन करावे.

श्री.नासेर सिध्दीकी :वसुलीसाठी प्रशासनाचे काय नियोजन होते?

श्रीमती किर्ती शिंदे :वसुली संदर्भात सभा घेतली होती. नवीन मिळकतींना कर आकारणी बाबत सर्वेक्षण करण्याचे ठरले होते. प्रशासनाने काय कार्यवाही केली? दर वाढीचा प्रस्ताव योग्य नाही. खाजगी व्यक्तीकडे किंवा मनपाकडून सर्वेक्षण होणे गरजेचे व वसुली व्हावी. टॅक्स रिव्हीजन सन-१९९० नंतर झाले नाही. दर पाच वर्षानी रिव्हीजन व्हावे. शहरात किती नवीन व जुन्या मालमत्ता आहेत? किती नव्याने किती बांधकामे केली? निवासीच्या ठिकाणी कमर्शियल वापर होतो. त्यांचेही सर्वेक्षण करावे. जी दर वाढ दिली, ती कोणत्या मालमत्तासाठी आहे. जे भरतात त्यांचेवर बोजा, जे भरत नाहीत त्यांना सवलत देता का? दरवाढीस विरोध आहे. सर्व मिळकतीचे सर्वेक्षण करावे. रिव्हीजन करावे. त्याप्रमाणे कर आकारणी व्हावी व वसुली करावी. त्यानंतर करवाढी बाबत विचार करावा.

श्री.नासेर सिध्दीकी :आमच्या पक्षाचा दरवाढीस विरोध आहे. वार्ड अधिकारी वसुली करीत नाहीत. जन्म व मृत्यू प्रमाणपत्र देण्यासाठीच वार्ड अधिकारी आहेत का? वसुली का करीत नाहीत? कर वाढ केल्यास कोणी भरत नाही. डिसप्युट मॅटर होते. वसुली येणे थांबते. येणारी वसुली होत नाही. ज्या सुचना सदस्य करतील त्यांचा विचार करावा. वसुली वाढवावी.

श्री.रेणुकादास वैद्य :ही कर वाढ केली नाही. भविष्यात नवीन ज्या मिळकती सापडतील, त्यावर कर वाढ सुचविली आहे. जुना टॅक्स आहे. त्यात वाढ नाही. कोणीही कर वाढीचे समर्थन करणार नाही. पारदर्शक ठराव ठेवत नाही. यात पळवाटा शोधण्याची संधी मिळते. सन-२०१० पासून प्रत्येक वर्षी अशाच प्रकारचा ठराव येतो. पान क्र.२ वर निवासी मध्ये सेवाभावी संस्था असे दिले. कमर्शियल इमारत असेल तेथे सेवाभावी संस्थांचा बोर्ड असेल तर निवासी कर लावणार का? खालचे कर्मचारी या गोष्टीचा दुरूपयोग करून भ्रष्टाचारास खतपाणी घालतात. यामुळे मनपाचे उत्पन्न कमी. कर्मचारी गब्बर होतात. असे प्रस्ताव येतांना प्रचंड ट्रान्सपरन्सी व स्पष्टता असण्याची गरज आहे. निवासेत्तर मध्ये दिले. वकीलाचे कार्यालय एखादा वकील राहत्या घरीच कार्यालय करतो. ते कशामध्ये धरणार आहे? त्यावेळी कर्मचारी पळवाटा काढतात. प्रशासनाने लक्ष द्यावे. शैक्षणीक संस्था अनुदानीत, विना अनुदानित फरक केला जातो. विना अनुदानित संस्थेस जास्त कर आकारतो. या संस्थांकडे अनेक थकबाकी आहे. दोन्ही संस्थांना एकाच प्रकारचा टॅक्स लावावा. वसुली होईल. शासकीय इमारतीना ७५.५० टक्के किंवा ३३ टक्के कर आकारणी करू शकतो. असे न्यायालयाचे निर्देश आहेत. बीएसएनएल कंपनी ७५ टक्के टॅक्स भरण्यास तयार आहे. प्रकरण क्लिअर करण्यास कुणी तयार नाही. मोबाईल टॉवर्स यांनी परवानगी मागितली दिली नाही. परवानगी न देता लिगल नाही म्हणुन दुप्पट दंड लावण्यास जातात. सिगंल टॅक्स लावावा. उत्पन्न येईल. पान क्र.३ मुद्दा क्रमांक १० वर दिले की, सिडको आणि शहर वेगळे करण्याची गरज नाही. शहराला जे दर आहे तेच सिडकोसाठी सुध्दा आहेत. मनपा हद्दीत एकच दर असावा. अवैध इमारतीवर शास्ती बसविणे असे दिले. मुळात अशी अतिक्रमणे होऊ देऊ नयेत.

कर वसुलीसाठी टेंडर काढावे. क्र.१४.१ मध्ये दिले गोलपटाव लाकडी छत हे शहरात कुठेच दिसत नाहीत. तेच तेच ठरावात टाकले जाते. पाणीपट्टी ५५ कोटी उद्दिष्ट पाच कोटी वसुल होते. यासंबंधीतचे रेकॉर्ड नाही, नागरीक कर भरण्यासाठी गेल्यास मागिल पावतीची मागणी केली जाते हे योग्य नाही. ज्या सुचना सदस्य करतील त्याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

श्रीमती संगीता वाघुले :माझ्या वार्डात गुंठेवारी रेग्युलाईज करावे. चाजक अटी शर्ती आहेत, त्या शिथील कराव्यात. कॅम्प लावावे.

श्री.भाऊसाहेब जगताप :मालमत्ता कर वाढीस विरोध आहे. नवीन मालमत्तांचा शोध घेऊन रेकॉर्डवर आणावे. वर्षभर वसुलीचे नियोजन करावे. तीन महिन्यातून आढावा बैठक घेतली जावी. वार्ड कार्यालयात कर्मचारी नसतात. अनेक नागरीक टॅक्स न भरता त्यांना परत जावे लागते. वसुलीसाठी टीम दिली. ते वसुली करतात का? लक्ष द्यावे. शहरात ५०० मोबाईल टॉवर्स असतील. त्यातून मोठे उत्पन्न येईल. रामनगर भागात आज एका मोबाईल टॉवर्सचे काम चालू आहे. ते थांबविले जात नाही. होर्डींग बाबत कार्यवाही करावी. शहरात ११८ वसाहती आहे. गुंठेवारी रेग्युलाईज केल्यास अनेक नागरीक कर भरण्यास तयार आहेत. अनेकांनी गुंठेवारीसाठी संचिका दाखल केल्या. त्या प्रकरणाचा निपटारा केला जात नाही. उलट गुंठेवारी भागासाठी डबल टॅक्स आकारला जातो ते योग्य नाही.

श्रीमती समीना शेख :क्र.०८ वर निवासी मालमत्ता यात सर्वांना समान कर लागतो असे दिले. जे गरीब नागरीक आहेत त्यांनाही तेवढाच व श्रीमंत नागरीक आहेत त्यांनाही तेवढाच कर हे योग्य नाही. उपभोक्ता कर दिले ते प्रति महिना की वर्ष आहे याचा उल्लेख नाही. डिमांड नोटीस जानेवारीमध्ये जातात. त्यामूळे जी सवलत घ्यायची ती ते मालमत्ताधारक घेऊ शकत नाही. कर वाढ करणे ऐवजी प्रत्येक मिळकतीचे टॅक्स रि-ॲसेसमेंन्ट करणे आवश्यक आहे. मा.न्यायालयात कराच्या संदर्भात जी प्रकरणे असतील त्यासाठी समिती गठीत करून कर अदालत घ्यावे.

श्रीमती सय्यद सरवत बेगम:र.रु.२३० कोटीचे उद्दीष्ठ ठेवले होते. त्यात र.रु.७० कोटी वसुल झाले. मार्च पर्यत र.रु.१०० कोटी वसूल होऊ शकेल. कर वाढ करण्या ऐवजी वसुलीसाठी नियोजन होणे आवश्यक आहे. नवीन मालमत्तांचा शोध घ्यावा. ॲसेसमेन्ट करावे, रेकॉर्डवर घ्यावे. वर्षभर वसुलीसाठी नियोजन असावे. झोन अधिकारी यांचेकडे इतर अनेक कामे असतात. त्यामुळे वसुली कमी येते. स्वतःहून जे जातात. त्यांना झोन अधिकारी टॅक्स लावतात. त्यांचेकडे इतर कामासाठी मॅन-पॉवर कमी आहे. अनेक इमारतीचे नवीन बांधकाम होते परंतु टॅक्स जुनाच असतो. जेथे घर तेथे कर असावा. वसुलीसाठी नवीन मालमत्ता शोधण्यासाठी पथक नेमावे. जी कर वाढ केली, ती करण्यात येऊ नये.

श्री.सिताराम सुरे :सन-२००५ मध्ये स्पेकने सर्वे केला. चुकीचा टॅक्स आकारणी केली. एकाच घराला दोन टॅक्स, त्यामुळे टारगेट पेक्षा ३० टक्केच वसुली आज आहे. १ लक्ष मालमत्ता अशा असतील त्यांना कर लागलेला नाही. जे भरतात त्यांचेवर बोजा

टाकणे बरोबर नाही. माझ्या वार्डात अनेक नागरीकांना चुकीचा कर लागलेला आहे त्यांनी तसा अर्ज ही वार्ड-ब मध्ये दिला. पुढे कार्यवाही होत नाही. असे डिसप्युट मॅटर बाबत प्रशासनाने वन-टाईम सेटलमेन्ट करावे. कर वसुलीत वाढ होईल. प्रत्येक वार्डात वसुलीसाठी टिम द्यावी. जी कर वाढ सुचविली ती मान्य करू नये.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:माझ्या वार्डात काही नागरीकांना एकदम १०-१५ वर्षाचा टॅक्स लागलेला आहे. त्यात मार्ग काढून कमीत कमी टॅक्स लावून कार्यवाही करावी. तसेच जेथे वसुली कमी आहे. अशा सर्वच वार्डात मिळकतीचे सर्वेक्षण करावे. वार्ड-वाईज नियोजन करावे.

श्री.विकास एडके :२३० कोटीचे प्रशासनाचे उद्दीष्ट का पुर्ण झाले नाही? जी वसुली झाली ती स्वत: येऊन भरणारे नागरीक आहेत. प्रशासनाने काय नियोजन केले? एमएसईबी, इतर शासकीय कार्यालयातून मिळकतीचा डाटा घेऊन त्या रेकॉर्डवर आणायला पाहिजे होते .त्या बाबत काय कार्यवाही केली?

कु.सायली जमादार :कर वाढीला विरोध आहे जे भरतात त्यांना भुर्दंड लादतो असे वाटते. नवीन मालमत्ताचा शोध घेऊन कर लावावा. सातारा-देवळाई भागातील मिळकतीना कर लावण्या बाबत काय नियोजन केले? कर भरण्यास काही नागरीक जातात त्यांना परत पाठविले जाते. प्रत्येक वार्ड-वाईज समिती नेमावी व ते टॅक्स वसुली संदर्भात काम पाहतील.

श्रीमती माधुरी देशमुख :वसुलीसाठी प्रशासनाने काय प्रयत्न केले? आपण सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. ज्या मालमत्तांना टॅक्स लागलेला नाही अशा मालमत्तांची नोंद घ्यावी. कमर्शियल मिळकती किती? जे भरतात त्यांचेकडूनच वसुली करण्याचे प्रयत्न करू नये. जे भरतात त्यांना तेवढ्या सुविधा देतो का? नळपट्टी भरण्यासाठी लोक वार्डात जातात. तेंव्हा आमच्याकडे रेकॉर्ड नाही. मागची पावती आणावी असे सांगतात. जेथे ब्युटीपार्लर व महिलांचे छोटे-छोटे व्यवसाय असतील, त्यास कर वाढविणे यास माझा विरोध आहे. अनधिकृत मोबाईल टॉवर्सला कर लावावे. रजिस्ट्री कार्यालयाकडून खरेदी विक्री होत असलेल्या मिळकतीचा डायरेक्ट डाटा मनपाकडे यायला पाहिजे. तशी कार्यवाही करावी. कर वाढीस माझा विरोध आहे.

श्रीमती अर्चना निळकंठ:कर वाढीस विरोध आहे. वसुली करण्यासंदर्भात यापुर्वी सर्वसाधारण सभेने अनेकदा सजेशन दिले. त्यानुसार प्रशासनाने काय कार्यवाही केली? आता सध्या महिलांना उद्योजकांसाठी प्रतिसाद देतो. जे असे उद्योजक महिला असतील त्यांना करातून वगळण्यात यावे. कोणत्या वार्डात किती वसुली झाली? खुलासा करावा.

श्रीमती अंकिता विधाते :नगर रचना चे उद्दिष्ट र.रु.७० कोटीचे होते. र.रु.१५ कोटीच वसुल झाले. सिवरेज टॅक्स मालमत्ता करातून वगळण्यात यावा.

श्री.राजू शिंदे :करवाढ करण्याची वेळ येऊ नये. वसुलीसाठी प्रशासनाने काय प्रयत्न केले. बजेट मध्ये मा.आयुक्तांनी म्हटले आहे की, मालमत्ता वाढविणे आवश्यक आहे.

पुर्नसर्वेक्षण करणार होते. १ एप्रिल पासून मोहिम हाती घेणार, मालमत्ता धारकांना मागणी पत्र वाटप करणार असे दिले. त्यानुसार २३० कोटीचे उद्दिष्ट प्रशासनाचे होते. र.रु.७७७ कोटीचे बजेटची आकडेवारी काढली, तर कुठेच बसत नाही. कार्यक्षम आयुक्त, अधिकारी यांचे नियोजन शुन्य कसे असू शकते? हे समोर आहे. प्रशासनाचे उद्दिष्ट र.रु.२३० कोटीचे होते का? होय, नाही काय असेल ते सांगावे. माझ्या माहिती प्रमाणे महापालिका ॲक्ट मध्ये पान क्र.४४३ दिले की, प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मा.आयुक्तांनी दिले पाहिजे.

मा.आयुक्त :सर्वाचे प्रश्न होऊन झाल्यानंतर खुलासा केला जाईल. नियम ५ मध्ये पुढे दिले की आयुक्तांच्या मते, महानगरपिलकेच्या हितास बाध येऊ न देता एखाद्या प्रश्नाचे उत्तर देणे शक्य नसेल तर किंवा त्यास जी माहिती गोपनीयरित्या कळविण्यात आली आहे, ती माहिती एखाद्या प्रश्नात विचारण्यात आली असेल तर, अशा प्रश्नाचे उत्तर देणे बंधनकारक नाही.

श्री.राजू शिंदे :पुढे नियमात काय आहे माहिती आहे. मी जे विचारले त्यामूळे महापालिकेला धोका निर्माण होणार आहे का? उद्दीष्ट काय होते एवढेच विचारले आहे.

मा.आयुक्त :जे बजेट मध्ये नमूद केले ते बोलण्याची गरज आहे असे वाटत नाही.

श्री.राजू शिंदे :बजेट मध्ये दिले ते बरोबर आहे. असे गृहीत धरतो. यानुसार आयुक्त कार्यक्षम परंतु अधिकारी शुन्य नियोजन आहे.

मा.आयुक्त :जे बोलत आहे त्यास विरोध आहे. अशा प्रकारचे बोलणे योग्य नाही.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात. मा.आयुक्त हे डायसवरून उठून बोलतात.

मा.महापौर :ते शब्द वगळण्यात येईल. ही बैठक महत्वाची आहे. चर्चा करायची आहे. अधिकारी यांनाही सुचना की, सभागृहाचे पिठासीन अधिकारी महापौर असतात, आयुक्त यांनी पिठासीन अधिकारी यांचे परवानगी शिवाय बाहेर जाऊ नये. तसेच आयुक्तांच्या इशारावर अधिकाऱ्यांनी बाहेर जाऊ नये. स.सदस्यानी सुध्दा बोलताना योग्य शब्द वापरावे. सर्वांनी मिळून महापालिकेचा कारभार चालवायचा आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :शहराच्या विकासासाठीच सदस्य बोलतात. पर्सनल आयुक्तांना कुणी बोलत नाही.

श्री.राजू शिंदे :र.रु.२३० कोटीचे मालमत्ताचे कराचे उद्दिष्ट होते. त्यापैकी ७३ कोटी फेब्रुवारीपर्यत वसूल झाले. नोटबंदीमूळे १५ कोटी आले नसता, ५८ कोटीच वसुली झाले असते. पगारापोटी दरमहा १२-१३ कोटी लागतात. पुर्ण वर्षाचा खर्च जो देणे आहे तो र.रु.३८४ कोटी आहे. र.रु.११० कोटी ठेकेदाराचे बील देणे आहे. येणारी रक्कम एलबीटी र.रु.२३० कोटी, मालमत्ता कराचे रक्कम ७३ कोटी, पाणीपुरवठ्याचे ४८ कोटी असे एकुण र.रु.३५१ होतात. ४९४-३५१=१४३ कोटी मागिल वर्षाचेच देणे आहे. जे की वसुली तेवढी झाली तर देता, येईल पुन्हा २४० कोटीच्या विकास कामास मंजूरी झाली. मनपाचे लाईट-कट होणे ही परिस्थिती कधी आली नव्हती. कर्मचारी यांना आजही पगार नाही. जायकवाडीची लाईट केंव्हा कट होईल? हे सांगता येत नाही. प्रशासनाने

वसुलीसाठी किती बैठका घेतल्या. ज्या वेळेस सुचना केल्या. त्याचे किती पालन प्रशासनाने केले. एमएसईबीची आकडेवारी व कनेक्शनचा डाटा सीडी द्वारे मी माहिती दिली. १.४० लक्ष शॉप ॲक्टचे लायसन्स आहे. २.४० लक्ष मालमत्तावर लाईटचे कनेक्शन धारक आहे. याची माहिती प्रशासनाला दिली होती. प्रशासनाने काय उपाय योजना केल्या. मा.सभापती, मा.महापौर असतील यांना विश्वासात घेतले नाही. किती वसुली झाली? माहिती देत नाही. स्थायी समितीला आयुक्त हजर राहत नाही. पदाधिकारी यांचे समवेत कधी बैठक आयुक्तांनी घेतली नाही. २००६ मध्ये ६ वार्ड कार्यालय केले. लगेच ज्या त्या वार्ड निहाय मालमत्ताची वसुलीचे काम सुरू केले होते. आता ९ वार्ड कार्यालय केले. आजही तीन वार्ड कार्यालयात वसुलीचे काम होत नाही. ५८ कर्मचारी काढून बेटाचे सौंदर्यीकरणासाठी नेमले किती? काम त्या लोकांनी केले. जे वसुलीचे कर्मचारी काढले त्यांचे जागेवर कुणीही दिले नाही. प्रशासनाची कार्यक्षमता कुठे दाखवून दिली जे की, मनपाचे उत्पन्न वाढले. १-१ कोटीचे कामे वार्डात होणार असे म्हटले. पाच-पाच वेळेस टेंडर रिकॉल होते. काम घेण्यास कुणी येत नाही. ती कामे होणार की नाही. नगरसेवक संचिका घेऊन पाठपुरावा केला नाही. तर पाच वर्ष वार्डात एकही काम होणार नाही. सचिव पदासाठी एलएलबी असणे आवश्यक आहे. वार्ड अधिकारी जे चांगली वसुली करीत होते. त्यांना सचिवाचा चार्ज दिला. दुसरे काही वार्ड अधिकारी दिले. एक ना अनेक कारणे वसुली होणेसाठी आहे. जे कर भरणार त्यांना कर वाढ लादणार का? जे कर भरतात त्यांना सुविधा देतो का? वसुलीसाठी नवीन काय उपाययोजना आयुक्तांनी केल्या समोर यावे. मार्चपर्यत एकही काम होणार नाही. सर्व स्पील मध्ये जाणार आहे. मार्च पर्यत सर्व कामे करायला पाहिजे. स्मार्ट सिटीसाठी ५० कोटीची तरतूद बजेट मध्ये केली. कोठून देणार आहे. खर्चाला कन्ट्रोल करणे आवश्यक आहे. ६७(३)क नुसार कामे करण्याला कन्ट्रोल करावे. २३० कोटीचे उद्दिष्ट होते वसुल झाले नाही. सदस्यांनी सजेशन दिले होते. त्यानुसार काय कार्यवाही केली? सविस्तर खुलासा करावा.

श्री.अब्दुल ताहेर शेख :कर वाढीचा जो प्रस्ताव आहे. त्यास विरोध आहे. न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणे निकाली काढावी. त्यामुळे बरीच थकबाकी आहे. जो पर्यत मनाई हुकूम होत नाही. तोपर्यत अशा प्रकरणात वसुली करू शकतो. सहजा सहजी अशा प्रकरणात मा.न्यायालय स्टे-ऑर्डर देत नाही. स्टे झाला असेल तर तेथे महापालिका कमी पडते. असा अर्थ होतो. मागिल बैठकीत सजेशन दिले होते की, अशी प्रकरणे तपासावी व निर्णय घ्यावा.

श्री.अय्युब जागीरदार :कर वाढीस विरोध आहे. वसुलीमध्ये का कमी पडलो? प्रशासनाने शोध घ्यावा. महापालिकेचा कारभार चालविण्यासाठी सर्वांनी मदत करणे आवश्यक आहे. आज २७ तारीख पगार झाले नाहीत. वीज लाईट बंद होते. पेपरला बदनामी कारक बातम्या येतात. हे योग्य नाही. शहरात ३ लाख मालमत्ता आहे. फक्त २ लक्ष मिळकतीना टॅक्स लावलेले आहेत. मातीचे घर होते. आरसीसीचे झाले. ४-

४ मजली घरे झाली. तेथे आजही जुना टॅक्स आकारला जातो. मालमत्ताचे रिव्हीजन होत नाही. ते करून घर तेथे कर असावा. कोर्ट प्रकरणे निकाली काढावीत. लोक अदालत घेऊन कार्यवाही करावी. मोबाईल, टॉवर्स, शादीखाना, पेट्रोलपंप, हॉटेल असतील त्यांना नियमानुसार कमर्शियल टॅक्स लावावा. तसेच शैक्षणीक संस्था, शाळा डोनेशन घेतात, टयूशन क्लासेस घेतात. यांनाही टॅक्स लावावा. धार्मीक स्थळाच्या ठिकाणी असलेल्या दुकानांना टॅक्स लावू नये. जे की येणारी रक्कम ही धार्मीक कामासाठी खर्च केली जाते. बिल्डरने बांधलेले इमारतीना कम्प्लीशन घेतले नाही. अशा सर्व इमारतीना टॅक्स आकारावा. शासनाकडून विकास कामासाठी निधी मागवावा. प्रशासनाने प्रत्येक वार्डासाठी १-१ कोटी दिले. प्रशासनाचे अभिनंदन करतो. जे जे प्रश्न सदस्यांनी उपस्थित केले. त्यांचा खुलासा घ्यावा.

मा.आयुक्त :प्रशासनाने ७७७ कोटीचे उद्दिष्ट होते. त्यात मालमत्ता कर २३० कोटी एलबीटी, नगर रचना, मालमत्ता असे चार माध्यमातून मोठे उत्पन्न मनपास मिळते. शासनाकडील येणे २३५ कोटीचे त्यापैकी १८६ कोटी जानेवारी पर्यत मिळाले. मालमत्ता करापोटी २३ फेब्रुवारीपर्यत ७५ कोटी वसुल झाले. मागिल वर्षी हा कर ६५ कोटी वसुल झाले होते. जी वसुली झाली त्यात समाधानकारक नाही. एकूण मालमत्ता २.०३ लक्ष आहे. ७२७९ मिळकतीचे नव्याने ॲसेसमेन्ट केले. यातून १५ कोटी मिळतील. ६९ हजार मालमत्ताचा कर वसुल झाला. जो की, ३४ टक्के आहे. १०० टक्के घरोघरी जाऊन वसुलीसाठी मॅन-पावर कमी आहे. टॅक्स भरण्यासाठी स्वॉईप मशीनची व्यवस्था केली. ऑनलाईन टॅक्स भरता येतो. पुणे शहरात १६० एजन्सीच्या माध्यतातून १४०० कोटी टॅक्स वसूल केला जातो. जे की ऑनलाईन कलेक्ट केले जाते. याप्रमाणे वसुली केल्यास नक्कीच सर्व मालमत्ताचा कर वसुल होऊ शकतो. मालमत्ताचे ॲसेसमेन्ट करण्यासाठी प्रपोज जी बी समोर सादर केले होते. परंतु ते रद्द करण्यात आले. पुर्ण मालमत्ताचे रि-ॲसेसमेन्ट केले. तर नक्कीच वसुलीत वाढ होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :मागिल वर्षी या वेळेस ६५ कोटीच वसुली होती. आताच म्हटले परंतु दर वर्षी १० टक्के मालमत्ता नैसर्गीक रित्या वाढ होते. ७५ कोटी वसुल केले. त्यात नोटाबंदीमूळे वाढ झाली आहे. यात म्हटले की, नेट बँकींग द्वारे पैसे भरता येतात. त्यातून किती वसुल होते माहित नाही. परंतु जे जमा झाले ते ज्यांनी स्वत:हून भरणा केले. तीच ही रक्कम आहे. आजही काही नागरीकांना डिमांड नोटीस गेली नाही. मुदतीनंतर जे व्याज आकारले जाते. त्याची जबाबदारी कुणावर असणार आहे. जे भरण्यास जातात. त्यांना जुनी पावती आणण्याचे सांगतात.

कर निर्धारक संकलक :एप्रिल मध्येच डिमांड नोटीस दिली आहे. पेपरला सुध्दा जाहीर प्रगटन दिले आहे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :जे कर भरण्यास जातात. त्यांना वार्ड मध्ये बसण्यासाठी व्यवस्था नाही. महिलासाठी तेथे कोणतीही सुविधा नाही.

| | |
|---|---|
| श्री.प्रमोद राठोड | :ऑन लाईन किती लोकांनी रक्कम भरणा केली? डिमांड नोटीसच वेळेत पोहचत नसेल तर वसुलीची अपेक्षा करणे उचीत नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :शेवटची डिमांड नोटीस केंव्हा दिली. |
| वार्ड अधिकारी-१ | :डिमांड नोटीस सिस्टम मॅनेजर कडून मिळाली. ते पुर्ण वाटप केले आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :टॅक्स कमेटी केली. एकही प्रकरण त्या कमेटीकडे गेले नाही. शुन्य नियोजन आहे. कशाच्या आधारावर टॅक्स वसुल करणार आहे. सिस्टम मॅनेजर यांना माहिती विचारावी. नियोजन करायला पाहिजे. बीएसएनएलचे कागदपत्र दिले एकत्रित बसून निर्णय का घेत नाही? शहराची प्रगती थांबायला नको. वसुलीवर भर द्यावा. |
| श्री.विकास एडके | :माझे वार्डात एकालाही डिमांड नोटीस दिली नाही. पुन्हा व्याज लावण्याची तयारी प्रशासन ठेवत आहे हे योग्य नाही. |
| मा.आयुक्त | :किती डिमांड नोटीस दिली. कोणते वार्डात डिमांड नोटीस पाठविली व शेवटची केंव्हा पाठविले माहिती नंतर दिली जाईल. डिमांड नोटीस देणे बाबत एप्रिल मध्ये निर्णय घेतला होता. नवीन ७२७९ ॲसेसमेन्ट केलेले आहे. महापालिकेने मान्यता दिली. तर पुर्ण डोअर-टू-डोअर ॲसेसमेंन्ट एजन्सीच्या माध्यमातून करता येईल. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :आज मंजूरी द्यावी उद्यापासून काम सुरू करावे. |
| श्री.राजू शिंदे | :ॲसेसमेन्टसाठी टेंडरच काढले पाहिजे असे नाही. ठराविक वेतनावर टेक्नीकल कर्मचारी घेऊन हे काम करू शकतो. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :आज मान्यता द्यावी कार्योत्तर मान्यतेसाठी पुढील सभेत यावे. |
| मा.आयुक्त | :७२०० मिळकतीचे ॲसेसमेन्ट केले. १३० कर्मचारी टॅक्स वसुलीसाठी दिले आहे. |
| श्री.विकास एडके | :कर निर्धारक व संकलक यांनी प्रिया मार्केट येथील बिअर शॉपीचे संचिका घेऊन उपआयुक्त मालमत्ता यांचेकडे दिली. ते त्यांचे काम सोडून दुसऱ्या विभागाचे काम करतात वसुलीवर त्यांनी लक्ष द्यावे. |
| मा.आयुक्त | :शासकीय कार्यालय ३८१ त्यातून १६ कोटी कर आहे. त्यापैकी २ कोटी मिळाले. मोबाईल टॉवर्स ४२० त्यांचेकडे १० कोटी येणे आहे. शैक्षणिक संस्था ३२९ आहे त्यातून १३ कोटी येणे आहे. न्यायालयीन प्रकरण २०४ असून ३१ कोटी येणे आहे. शासकीय कार्यालयाचा टॅक्स बाबत संबंधीत एचओडी यांना कळविले की, तात्काळ कर भरावा. मोबाइल टॉवर्स एजन्सीला आदेशीत केले आहे. शैक्षणिक संस्था असेल असे एकूण १३३४ मिळकती आहे की, ६५ कोटी येणे आहे. टॅक्स वसुलीसाठी पोलीस प्रोटेक्शन घेणार आहे. निवडणुकीमूळे ते मिळाले नाही. एक दोन दिवसात टीम तयार करून तीही कार्यवाही केली जाईल. ११५ वार्ड मधील कराची वसुलीसाठी मार्च पर्यत कर्मचारी नियुक्त केले. काही ठिकाणी ज्या ठिकाणची वसुलीच झाली नाही. असे ३-४ वार्ड एकत्रित करून टीम लावून कर वसुलीचे काम मार्च पर्यत सुट्टीच्या दिवशी सुध्दा चालू राहिल. प्रभाग समिती सभापती यांचे माध्यमातून वसुली बाबत बैठक घेणार |

आहे. टॅक्स ॲसेसमेंन्ट केले शासकीय कार्यालय, मो.टावर्स व शैक्षणिक संस्था किती त्यांचेकडून किती येणे आहे. याची माहिती घेतली.

श्री.रेणुकादास वैद्य :डिमांड नोटीस द्यावी. नागरीक टॅक्स भरण्यास तयार आहे. बीएसएनएल कंपनी टॅक्स भरण्यास तयार आहे. ते प्रकरण निकाली काढावे. कंपनीचा डाटा घ्यावा सॉप्टवेअर इंजिनिअर नियुक्त करा. नागीरकांना एसएमएस करा. ते वार्डात जाऊन बील पेड करतील. अशी सुविधा उपलब्ध करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :मंगल कार्यालय, शॉप, कमर्शियल कॉम्प्लेक्स असतील. याना नोटीस दिली परंतु तेवढी वसुली नाही. एक लक्षच्या वरती असलेले थकबाकीदार यांची नावे पेपरला प्रसिध्द करून नोटीस देऊन जप्तीची कार्यवाही करू असे म्हटले होते. यांचेकडून वसुली करावी. नियोजन करावे. कर अदालत लावून मनपाच्या हक्काचे जे येणारे पैसे ते वसुल करावे. महावितरणाकडे २.५० कोटी बाकी आहे ते वसुल करावे. शासकीय कार्यालयाकडून जी रक्कम येणे असेल ती वसुल करण्यासाठी संबंधीत विभाग प्रमुखाशी चर्चा करून कार्यवाही करावी.

श्री.प्रमोद राठोड :मोबाईल टॉवर्स बाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचा एक निर्णय झाला. त्याची माहिती प्रशासनाला आहे का?

कर निर्धा. व संकलक :१६ डिसेंबर १६ चा मा.न्यायालयाचा निर्णय झालेला आहे. गुजरातची मोबाईल टॉवर्स कंपनी होती व अहमदाबाद कार्पोरेशनचे ते प्रकरण होते. त्याची प्रत आलेली आहे. मोबाईल टॉवर्सला इमारती प्रमाणेच कर आकारणी करावी. असा निर्णय झालेला आहे. या बाबत विधी सल्लागार यांचेशी चर्चा केली. परंतु काही टॉवर्स बाबत मा.उच्च न्यायालयात प्रकरणे आहे. हा निर्णय येण्याच्या अगोदरपासून आहे. आता विधी विभागाने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबत मा.उच्च न्यायालयात सबमीट करायला पाहिजे.

श्री.प्रमोद राठोड :विधी विभागाने तसे मा.कोर्टात सबमीट केले का? टॅक्स वसुल करण्याची काळजी प्रशासनाला नाही का? हा विषय कार्यवाहीस्तव घेऊन वसुली करायला पाहिजे होती.

मा.महापौर :विधी विभागाकडून माहिती घ्यावी सभा अर्धा तासासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ २.२० वाजता पुन्हा सभेला सुरूवात ३.५० वाजता)

श्री.राजगौरव वानखेडे :विभाग वाईज किती उद्दीष्ट होते किती वसुल झाले.

श्री.अब्दुल नाईकवाडी :गुंठेवारी भागातून डबल टॅक्स वसुल केला जातो. तर गुंठेवारी रेग्युलाईज करणार आहे का?

श्री.जमीर कादरी :नळ टॅक्स व मालमत्ता कर एकाच वेळी नोटीस वाटप कराव्यात. घर एकाच्या व नळ दुसऱ्याच्या नावाने असतो ते कलेक्ट करावे. ५० वर्षापुर्वीच्या मिळकती त्यांना व नवीन इमारतीना सारखाच कर आकारला जातो. याचा विचार करावा.

श्री.सिताराम सुरे :सिव्हरेज कर रद्द करावा. किती वर्ष वसुल करणार होतो? व किती दिवस वसुल करणार आहे.?

श्री.कैलास गायकवाड :२-३ वर्षापासून वर्ग-३-४ चे कर्मचारी वसुलीसाठी दिले होते. चांगली वसुली होत होती. मध्यतंरी काहीच्या बदल्या केल्या त्यामूळे वसुली कमी येते. नऊ

झोन आहे शासनाचे काही अधिकारी झोनला दिले. परंतु जे पुर्वीपासून झोनमध्ये काम केले. चांगली वसुली केली. असे अधिकारी जसे श्री.सुर्यवंशी डी.डी. यांना सचिव पदी बसविले तसेच कामगार अधिकारी यानी चांगली वसुली केली. त्यांना झोनला पाठवावे. वार्ड अधिकारी दर्जाचे जे अधिकारी असतील, त्यांना वार्ड अधिकारी म्हणुन नियुक्ती द्यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :वसुलीसाठी वर्षभर कर्मचारी देऊन नियोजन करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :१०० कर्मचारी नेमावे. दररोज एक कर्मचारी यांनी १०० घराला व्हिजीट दिली. तरी एक महिन्यात ३ लक्ष मिळकतीला भेटी देऊन कर वसुली करू शकतात. पुढील वर्षापासून किमान तीन महिण्याला नोटीस दिली जावी.

श्री.राजू शिंदे :जी वसुली झाली त्यात प्रशासन समाधानी आहेत का?

मा.आयुक्त :डिमांड नोटीस मिळाल्या नसतील. तरी ते नागरीक ऑन लाईन टॅक्स भरू शकतात.

श्री.नंदकुमार घोडेले :वर्षातून चार वेळेस ३-३ महिन्याची डिमांड नोटीस द्यावी, जेणे करून वसुली पुर्ण होईल.

श्री.गजानन बारवाल :ऑन लाईन वर कर भरणे सक्सेस होते का? माझे वार्डात १ टक्का ऑनलाईनद्वारे वसुली नाही.

मा.आयुक्त :वेब-साईट उपलब्ध आहे. भविष्यात ऑनलाईन वसुली करण्यावरच भर द्यावा लागेल. ऑन-लाईन वसुली बाबत माहिती दिली जाईल. मालमत्ता टारगेट १० कोटी ३ कोटी वसुल, प्राणी संग्रहालय २.५० कोटी त्यापैकी १.०२ कोटी, आरोग्य विभाग १ कोटी होते ७६ लक्ष वसुली. उद्यानचे २.५० कोटी होते. अग्निशमनचे २ कोटी पैकी १.५० कोटी, पाणीपट्टी मनपा व समांतर वाहिनी हिस्सा ९५ कोटी होते. पैकी ३१ कोटी झाले. शासकीय अनुदान ७६ कोटी पैकी ३७ कोटी झाले. कर्मचारी संख्या कमी आहे. जस जशी मागणी आहे. त्याप्रमाणे ऑऊट सोर्सींग नुसार कर्मचारी भरती करणार आहे. गुंठेवारी मध्ये ॲसेसमेन्ट झालेले नाही. ॲसेसमेन्ट व परवानगी हे दोन वेगळे भाग आहे. रेग्युलाईज करायचे. हे नियमानुसार होईल. काही ठिकाणी ॲसेसमेन्ट करण्याचे काम सुरू केले. गुंठेवारी भागातूनही टॅक्स वसुल करण्याचे काम सुरू आहे. मनपाच्या मालमत्ता आहेत. त्याचे टॅक्स वसुल करण्याचे काम चालू आहे. दोन नाट्यगृह आहे दुरूस्ती करून चालवण्यास दिले तर नक्कीच उत्पन्न येईल. या बाबत चर्चा करून निर्णय घेऊ. नवीन मिळकतीचा ७ हजार सर्वे केला आहे. १०३ कर्मचारी यांना हे काम देणार आहे. सफाई कर्मचारी हे वसुलीसाठी होते. त्यांना ते कामातून मुक्त केले. एप्रिल नंतर पुन्हा कर्मचारी यांचे बदली करणार आहे. वार्ड अधिकारी यांचेकडे वसुली व इतर स्वच्छ भारत अभियान असे अनेक कामे आहे. निवासी मध्ये कमर्शियल मिळकती झाल्या. त्यांचे ॲसेसमेन्ट सुरू आहे.

श्री.राजू शिंदे :वर्षभरात प्रशासनाने वसुलीसाठी काय नियोजन केले? ते सांगावे जे सांगत आहे. ते पुढील वर्षाच्या वसुलीसाठी नियोजनाचे बोलत आहे.

| | |
|---|---|
| मा.आयुक्त | :मोबाईल टॉवर्स बाबत नोटीस देऊन कार्यवाही करू. काही एजन्सी समोर आलेले आहे. अनधिकृत बांधकामावर नियंत्रण आणले जाईल. जे रेग्युलाईज करता येत असेल तशी कार्यवाही होईल. बिल्डरने परवानगी घेतली. भोगवटा घेतला नाही. त्याची माहिती घेऊन यादी तयार केली आहे. नोटीस दिली आहे. प्रत्येक वार्डात १ ऑक्टोबरला पत्र काढून प्रत्येक प्रभाग समिती मध्ये कॅम्प घेणे. बाबत आदेशीत केले होते. जेथे कॅम्प झाला नाही. ते घेण्यात येईल. डिसप्युट प्रकरणासाठी कमेटी तयार केली. कमेटी निर्णय घेईल. १२-१४ केसेस आलेल्या आहे. सातारा-देवळाई मध्ये कॅम्प घेतले, जेथे रेग्यूलाइज करता येते का? त्यानुसार कार्यवाही करणार आहे. रजिस्ट्री कार्यालय व इतर कार्यालया सोबत बैठक घेतली. जो डाटा त्यांचेकडे आहे. तो घेऊन आपल्या मिळकती कलेक्ट करून कार्यवाही केली जाईल. होर्डींगचे टेंडर लवकरच करणार आहे, पार्कीगची वसुली करणार आहे. प्रत्येक ॲसेसमेन्ट करणार आहे. वसुली मोहिम मध्ये १०३ कर्मचारी कार्यरत आहे. ३१ मार्च पर्यत बरीच वसुली होणार आहे. उर्वरीत वसुलीसाठी डिमांड नोट गेलेली आहे. कोणत्या वार्डातील डिमांड केंव्हा दिली माहिती देण्यात येईल. इतर विभाग वाईज जी वसुली आहे. ती करण्याचा प्रयत्न केला जाईल. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :ज्या वार्डातून टॅक्स वसुल होत नाही. तेथे वसुलीवर लक्ष केंद्रीत करावे. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :रेकॉर्डवर असलेल्या नोंदीनुसार फक्त ७० हजार लोक टॅक्स भरतात. जे भरत नाही. त्यांचेकडून वसुली करावी. तसेच १ लक्ष पेक्षा जास्तीचे थकबाकीदार असतील. पेपरला जाहीर प्रगटन देऊन जप्तीची कार्यवाही करून वसुली करावी. |
| मा.आयुक्त | :ज्यांचेकडे जास्त थकबाकी आहे. त्याची यादी तयार केली आहे. १ मार्च नंतर कार्यवाही करणार आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :व्यावसायीक असलेल्याकडे किती कर बाकी आहे.१ महिण्यात कार्यवाही करून वसुली करावी. डिसप्युट मॅटर सोडविण्याकरीता कमेटीकडे पाठवून कार्यवाही करावी. |
| श्री.राजू शिंदे | :पाणीपट्टीची तुट किती आहे. माझ्या माहिती प्रमाणे ६० कोटीची तूट आहे. |
| मा.आयुक्त | :पाणीपट्टीचे टारेगट ९५ कोटी होते ३१ कोटी वसुल झाले. यापुर्वी सर्व डाटा कन्झ्युमंरसकडे होता. आता इन्डारेक्ट कन्झ्युमरचा डाटा कलेक्ट केला आहे. मालमत्ता व पाणीपट्टी बरोबरच वसुल करणार. यासाठी वेळ लागेल. १०० टक्के वसुली करणार आहे. |
| श्री.राजू शिंदे | :डेटा लवकर घेऊन का वसुली केली नाही? एकूण २.०३ लक्ष मालमत्ता जे स्वत:हून येऊन कर भरतात. त्यांचे ७० कोटी वसुल झाले. ही डिमांड नोटीस दिलेल्याची वसुली नाही. जी वसुली झाली. त्यात मा.आयुक्त समाधानी आहेत का? ६ झोनचे ९ झोन केले. आकृतीबंधास मान्यता घेतली होती का? |
| मा.आयुक्त | :या प्रश्नाचे उत्तर पुढील बैठकीत देण्यात येईल. |

| | |
|---|---|
| श्री.राजू शिंदे | :वसुली होत नाही. आमच्या वार्डातील कामे होणार की नाही? ऑनलाईन किती रक्कम जमा झाली? डिमांड नोटीस केंव्हा दिली? कोणत्या वार्डातून किती वसुली झाली हे सर्व कागदावर नाही.तर नियोजन आहे हे कसे समजायचे.२४ टक्के वसुली झाली महिनाभरात पुर्ण वसुली होणार नाही. जे भरतात त्यांचेवर बोजा टाकणार काय? सर्वच महापालिकेत आर्थिक कणा हा मालमत्ता कर आहे. शासन प्रत्येक वेळी अनुदान देणार का? महापालिकेने स्वतःच्या पायावर केंव्हा उभे राहायचे? हा प्रश्न आहे. टेलीफोन बील, लाईट बील कट होते ही वेळ का आली? ज्यातून मनपास उत्पन्न मिळते त्याकडे लक्ष देण्याची प्रशासनाला गरज होती. ५८ कर्मचारी वसुलीतून काढले त्यांचे जागेवर कर्मचारी दिले का? मी एमएसईबीचा डाटा, सिडी मार्च २०१६ मध्ये दिली होती. शॉप ॲक्ट नुसार त्या मिळकतीची माहिती दिली. साफ्टवेअर तयार करून ज्या मनपाच्या रेकॉर्डवर मिळकती नाहीत. त्या मिळाल्या असत्या या बाबत कार्यवाही का केली नाही. |
| श्रीमती समीना शेख | :वसुलीसाठी प्रशासन कमी पडले आहे. वसुलीसाठी भर दिला पाहिजे. आपल्या सुचना दिल्या पाहिजे. अकार्यक्षम कोण आहे? हे आपण सिध्द करू शकत नाही. या महापालिकेला मा.आयुक्त यांनी भ्रष्टाचार मुक्त केले आहे. जे भ्रष्ट अधिकारी होते त्यांना काढून टाकले आहे. त्याबद्दल मा.आयुक्तांचे अभिनंदन करते. यंत्रणा कमी झाली त्यामुळे वसुली कमी आलेली आहे. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :युटीलीटी कंपनीकडे पाणीपुरठ्याचा डाटा आहे. तो घेणेसाठी रितसर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार द्यावी. जी तुट आली ती भरून काढावी. |
| मा.आयुक्त | :काही डाटा आलेला आहे.मालमत्ता व पाणीपट्टी वसुली सोबत सुरू केला आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :स.सदस्यानी सुचना केल्या. त्याचे समर्थपणे उत्तर मा.आयुक्तांनी **केला.** वसुली होणार आहे. उपाययोजना करणार आहे. शब्द दिला. वार्डातील विकास कामे व्हावी ही भावना आमची आहे. ती होणार असेल तर हरकत नाही. प्रशासनाने योग्य नियोजन करावे वसुली करावी. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :राज्य शासनाकडे विकास कामासाठी निधीची मागणी केली. पाठपुरावा करावा. |
| श्री.राजू शिंदे | :वार्डातील विकास कामे होतील. प्रशासनाने आश्वासन द्यावे. |
| मा.महापौर | :मालमत्ता कराचे उत्पन्न वाढले पाहिजे. प्रत्येक वार्डात कामे व्हावीत. आताच सुचना केल्यानुसार व प्रशासनाचा घेतलेला खुलासा व आढावा यावरून असे दिसते की, वसुली ही समाधानकारक नाही. वसुली मध्ये कमी पडलो जे की, लाईट कट होणे, मोबाईल बंद होणे, भविष्यात पाणी पुरवठ्याची लाईन कट करण्याचे कंपनीने दिलेले संकेत हे महापालिकेसाठी भुषणावह गोष्ट नाही. स.सदस्य व प्रशासन हे समाजासाठी काम करतात. जनतेशी आपली बांधीलकी आहे. प्रशासनाने मालमत्ता कर वसुलीसाठी खालील प्रमाणे कारवाई करावी.<br>१. शहरातील विद्युत कनेक्शन नुसार संबंधीत महावितरण कपंनीकडील यादी, शॉप ॲक्टची यादी घेऊन त्यानुसार मिळकती कलेक्ट करून अशा सर्वच मालमत्तांना टॅक्स आकारून वसुली करावी. |

२. होंर्डीग बाबत जे डिसप्युट मॅटर आहे. एजन्सीशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेऊन कर आकारणी करणे व वसुली वाढवावी.

३. बिल्डर यांनी बांधकाम परवानगी घेतली, परंतु भोगवटा प्रमाणपत्र न घेणे त्या मिळकतीला टॅक्स न लावणे. असे प्रकार झालेले आहेत. अशा बिल्डरांना चर्चेसाठी बोलावून योग्य ती कारवाई करून त्या मिळकतींना कर आकारणी करावी.

४. शॉपींग मॉल, कॉम्प्लेक्स असेल, कमर्शियल ज्या मिळकती असतील त्यांचा शोध घेऊन अशा मिळकतींना कर आकारणी करून वसुली करावी.

५. नवीन मालमत्ताचे सर्वेक्षण करणेसाठी टेंडर काढण्याची कार्यवाही करावी. तसेच प्रशासकीय कार्यालये व इतर इमारती यांचे कडे असलेली थकबाकी संबधीत विभागाशी चर्चा करून वसुली करण्याबाबत कारवाई करावी.

६. शैक्षणिक संस्थाकडे असलेला कराबाबत त्यांचेशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा. एमआयडीसीच्या बाबतीत डिसप्युट प्रकरण आहे. त्यांना बोलावून जो कर लावण्याबाबत निर्णय झाला तीच कर आकारणी करावी.

७. अनधिकृत टॉवर्स बाबतीत योग्य निर्णय घ्यावा. जिल्हा उपनिबंधक (रजिस्ट्री) कार्यालयाकडून मिळकतीची यादी घेऊन त्या त्या मालमत्ता रेकॉर्डवर आणून ॲसेसमेन्ट करून त्या मिळकतीला टॅक्स लावावा व वसुली करावे.

८. नामातंराची जुनी प्रकरणे निकाली काढावी. प्रत्येक वार्ड कार्यालयामध्ये वसुली संदर्भात बैठक आयोजित करण्याबाबत नियोजन करावे. त्यात मा.आयुक्त, मी स्वत: तसेच स.पदाधिकारी उपस्थित असतील.

९. वसुली बाबत दैनंदिन अहवाल सर्व स.पदाधिकारी यांना देण्यात यावा.

स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता प्रस्तावामध्ये जी जी दर वाढ सुचविली ती रद्द करण्यात येते व सन २०१६-१७ या आर्थीक वर्षासाठी जे मालमत्ता कराचे दर होत तेच सन २०१७-१८ या वर्षासाठी कायम करण्यात येते.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावामध्ये जी मालमत्ता कराची दरवाढ सुचविली ती रद्द करण्यात येते व सन २०१६-१७ या आर्थीक वर्षासाठी असलेले मालमत्ता कराचे दर सन २०१७-१८ या वर्षासाठीही कायम राहतील. त्याचप्रमाणे उपरोक्त मुद्दे क्र.१ ते ९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मालमत्ता कराच्या वसुलीत वाढ होण्याच्या दृष्टिने प्रशासनाने योग्य ते नियोजन करावे. तसेच नव्याने निविदा काढण्यासाठी मान्यता देण्यात येते. प्रशासनाने त्वरीत निविदा काढण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर राष्ट्रगीताने सभा संपन्न झाल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.